

# मराठी राजभाषा दिवस मनाया

कार्यक्रम में उपस्थित प्राचार्य जैन, प्रा.गंगने, प्रा.गायकवाड एवं अन्य.

**सालेकसा :** एम.बी.पटेल कला-वाणिज्य महाविद्यालय में मराठी राजभाषा गौरव दिवस मनाया गया. मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा.भगवान साखरे ने कार्यक्रम का आयोजन किया. अध्यक्षता प्राचार्य डॉ.बी.के.जैन ने की. प्रमुख अतिथि के रुप में अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.वर्षा गंगने, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.रुपराव गायकवाड, प्रा.डॉ.नामदेव हटवार व अंग्रेजी विभाग प्रमुख डॉ.परिमल डोंगरे उपस्थित थे. कार्यक्रम की शुरुआत में कवि कुसुमाग्रज की प्रतिमा पर माल्यार्पण किया गया.

लोकमत समाचार - 9.3.2025



देशोन्नती

# एम.बी.पटेल महाविद्यालयात कवि संमेलनाचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन

**सालेकसा :** गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित एम. बी. पटेल कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथे २६ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत कविसंमेलन रंगले. मराठी भाषेला अधिक बोलकी, भावपूर्ण बनविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या भावना व विचार यांना चालना देण्यासाठी मराठी भाषा विभागप्रमुख प्रा. भगवान साखरे यांनी प्राचार्य डॉ. बी. के. जैन यांच्या मार्गदर्शनात व अध्यक्षतेखाली मराठी कविसंमेलनाचे यशस्वी आयोजन केले.

याप्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा गंगणे प्रमुख अतिथी स्वरूपात उपस्थित होत्या. व्यासपीठावर इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. परिमल डोंगरे, भूगोल विभागाचे डॉ. अश्विन खांडेकर, आयोजक प्रा. भगवान साखरे इत्यादी उपस्थित होते.




कविसंमेलनाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. भगवान साखरे यांनी केले. तर, उत्कृष्ट संचालन बीए तृतीयची प्रगती शहारे या विद्यार्थीनीने केले. सतत दोन तास विविध विषयांवरील कवितांनी रसिक श्रोत्यांना खिळवून ठेवले. या रसपूर्ण कार्यक्रमात काजल चौधरी, निकिता लिल्हारे, योगिता लिल्हारे, अर्चना मेश्राम, काजल पटले, पायल उईके, अंजली बागडे, कावेरी ठाकरे, पिंकी नेवारे, किरण खुरसिंगे, राधिका मरस्कोल्हे यांनी कविता वाचन केले. व्यासपीठावरील उपस्थित पाहुण्यांनी देखील आपापल्या कविता सादर करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श स्थापित केला. आभार प्रदर्शन डॉ. बाबूसिंग राठोड यांनी केले. कवि संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभाग आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.








बांगरे आदी उपस्थित होते.

## मनोहरभाई पटेल महाविद्यालय, सालेकसा



**सालेकसा :** स्थानिक मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळातर्फे प्राचार्य डॉ. बी. के. जैन यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. वर्षा गंगणे, डॉ. नामदेव हटवार, डॉ. परिमल डोंगरे, प्रा. भगवान साखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य जैन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे नेहमीच विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असून, जगाला मार्गदर्शन करणारे राहतील असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भगवान साखरे यांनी केले. संचालन डॉ. अश्विन खांडेकर यांनी तर आभार डॉ. परिमल डोंगरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. रितू तुरकर, प्रा. मंडले, ग्रंथपाल अरविंद भगत, प्रा. मनोहर वाघेरे, प्रा. बाबूसिंग राठोड, प्रा. वाय. आर. जोगी, प्रा. राकेश बहेकार आदींनी परिश्रम घेतले.